# प्रकरण - पहिले

# प्रस्तावना

# प्रकरण - पहिले

# प्रस्तावना

**प्रस्तावना :-**

प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात इयत्ता ३ री पासून लेखन क्षेत्रात निबंध लेखनाचा समावेश करण्यात आला आहे. इयत्ता तिसरीपासून सुरू होऊन त्याची व्याप्ती उच्च प्राथमिक व नंतर माध्यमिक शिक्षणात चढत्या क्रमाने समाविष्ट करण्यात आली आहे. लेखनक्षमता ही एक सर्जनात्मकता आहे. लेखन क्षमता विकसनासाठी प्राथमिक स्तरावर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. लेखन ही भाषेच्या अभ्यासाची खरी परीक्षा आहे. भाषा बोलणे, वाचणे, लिहिणे व समजून घेणे म्हणजे भाषा आत्मसात झाली असे नाही. त्याची कसोटी दुसरा कोणी ऐकणारा पुढे आल्याशिवाय होत नाही. मग तो ऐकणारा, वाचणारा, बोलणारा कोणीही असो. कुठलीही भाषा मुळात निर्माण का झाली तर दुसऱ्या कुणाला तरी आपल्या भावना, आपले विचार उत्कटतेने सांगावे आणि त्यांचे विचार समजून घ्यावे असे प्रकर्षाने वाटल्यामुळे. मराठी शिक्षणाचा प्रमुख हेतू आपले विचार, आपल्या भावना सुस्पष्टपणे दुसऱ्याला सांगता याव्यात हा आहे. भाषिक कौशल्यावर इतर विषयांची प्रगती ही अवलंबून असते. या दृष्टीने लेखनाचे विशेष महत्व आहे.

लेखनासंदर्भात ज्या प्रचलित पध्दती आहेत त्यात एक प्रकारचा साचेबंदपणा आहे. शिक्षकाने सुचविल्याप्रमाणे विद्यार्थी विचार करून लेखन करतात किंवा कोठेतरी साचेबंदपणे लिहिलेला निबंध लिहून आणतात, तोंडपाठ करतात. निबंध लेखनाचे विषयही बध्द (close type) स्वरूपाचे असतात. वास्तविक माध्यमिक स्तरावर इयत्ता १० वीत १०० गुणांपैकी १५ गुण निबंध, ८ गुण पत्रलेखन, ५ गुण सारांशलेखन, उतारा अथवा कवितेवरील प्रश्न ७ गुण असे एकूण ३५ गुण व व्याकरण भागावर १५ गुण मिळून ५० गुणांची भाषिक क्षमता (Lingustic item) तपासणीवर आधारीत प्रश्नपत्रिका असते. उर्वरित ५० गुण आशयावर (content) आधारित भागावर असतात. अशाच प्रकारची रचना उच्चप्राथमिक स्तरावर प्रश्नपत्रिकेमध्ये केलेली आढळते.

बहुतांश शाळांमध्ये आशयावर (पाठ्यपुस्तकावर) जास्त भर दिला जातो. निबंध लेखनासाठी विशिष्ट अध्यापन पद्धती जोपासून मार्गदर्शन केल्यास त्याचा दर्जेदारपणा वाढावा या दृष्टीने इयत्ता १० वीत १५ गुणांसाठी ३० तासिका निबंधाच्या मार्गदर्शनासाठी आवश्यक आहेत. प्राथमिक स्तरापासून निबंधलेखनासाठी मार्गदर्शन तासिका आवश्यक आहेत. कारण पियाजेच्या मते १ ते ३ इयत्तात व पुढे ५ व ६ इयत्तात सर्जनात्मकता झपाट्याने वाढते. यादृष्टीने अध्यापनाच्या सर्जनात्मक विकास प्रतिमानाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## १.१ संशोधनाची गरज व महत्व :-

विल्यम गॉर्डनने १९६१ साली सर्जनात्मक विकास प्रतिमान प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात उपयोगात आणले. या प्रतिमानाची रचना समस्या सोडविण्याच्या विचाराशी व लेखनाच्या क्षेत्राशी निगडीत आहे. वर्गाध्यापनामध्ये त्याचा वारंवार वापर केल्यानंतर विद्यार्थी प्रतिमानाचे कौशल्य स्वत:च आत्मसात करून सर्जनात्मक विकास करण्यास प्रवृत्त होऊन लेखन क्षमता विकसित होऊ शकेल असे गॉर्डनचे मत आहे.

सर्जनशीलता ही काही विशिष्ठ निवडक लोकांची मिरासदारी नव्हे. या शक्तीचा लाभ प्रत्येकाला झाला आहे. हा विचार जसा मानसशास्त्रज्ञांनी मांडला तसाच आणखी एक विचार मांडला, तो म्हणजे 'सर्जनशीलता ही विकासक्षम मानसिक शक्ती असून तिचा विकास होऊ शकतो'. प्रतिभा ही 'Ten Percent Inspiration & Ninty Percent Perspiration' असे लिव्हीग्स्टनने म्हटले आहे. प्रतिभा ही जर प्रयत्नाने व अभ्यासाने विकसित होऊ शकते तर सर्जनशीलतेच्या बाबतीत हे कितीतरी अधिक खरे आहे.

वरील दृष्टीकोनातून प्रतिमानाची व सर्जनशीलतेची सांगड घालून सर्जनात्मक लेखन आपल्या वर्गाध्यापनातून कसे प्रत्ययास येईल, त्याचा विकास कसा होऊ शकेल हे पाहणे अभिप्रेत आहे. या दृष्टीने इयत्ता ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांना प्रवृत्त करून सर्जनात्मक विकास प्रतिमानाचे तंत्र जर विद्यार्थ्यांनी या वयात आत्मसात केले तर ते त्यांना पुढील काळात खचितच उपयोगी पडू शकेल.

यासाठी या तंत्राचा प्रचलित पध्दतीच्या तुलनेत कितपत उपयोग होतो हे पाहणे गरजेचे ठरते. जॉन पियाजेने जो सर्जनशीलतेचा विकास १ ते ३ इयत्तेत झपाट्याने होतो व पुढे ४, ७ व ११ इयत्तांमध्ये त्याचा ऱ्हास झाल्यासारखा वाटतो पण इयत्ता ५ वी व ६ वी मध्ये ती वेगाने वाढते असे म्हटले आहे. तेही या संशोधनात अभ्यासले जाणार आहे. त्यावरून कोणत्या इयत्तेत आपणास सर्जनशीलतेवर भर देणे गरजेचे आहे हे ठरविता येईल.

त्याच प्रकारे उच्च प्राथमिक स्तरावर या प्रतिमानाचा सराव विद्यार्थ्यांना दिल्यास माध्यमिक, उच्चमाध्यमिक स्तरावरही उपयोग मोठ्या प्रमाणावर होऊ शकेल. या प्रतिमाच्या वापरामुळे सर्जनशीलतेतील प्रवाहित्व, लवचिकता, विविधता, वैचित्र्य, मौलिकता, विस्तार, पुनर्रचना, उणीव-दोष, समस्या, संवेदनक्षमता या घटकांचा विकास होऊ शकेल.

## १.२ संशोधन समस्येचे शब्दांकन :-

उच्च प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमातील मराठी लेखन क्षमतेत सर्जनात्मक विकास प्रतिमानाच्या परिणामकतेचा अभ्यास.

## १.३ समस्या शब्दांकनातील पारिभाषिक संज्ञांचा अर्थ :-

**उच्च प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम** - नवीन शैक्षणिक धोरण १९८६ नुसार ८+२+२+३ असा आकृतीबंध रचला आहे. त्यामध्ये पहिली ८ वर्षे ५+३ या दोन गटात विभागली आहेत. पहिली ५ वर्षे निम्न प्राथमिक स्तर व त्यापुढील ३ वर्षे ही उच्च प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम दर्शवितात.

**मराठी** - महाराष्ट्र राज्यातील बहुसंख्य विद्यार्थ्यांची मराठी ही मातृभाषा असून ती महाराष्ट्र राज्याची राजभाषासुध्दा आहे. प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात महाराष्ट्र राज्यात त्रिभाषा सूत्रांतर्गत येणारी प्रथमभाषा म्हणून शिकविली जाणारी मातृभाषा मराठी हा विषय अशा अर्थाने संज्ञा वापरली आहे.

**लेखनक्षमता -** मानवी मनातील भावनांचा, विचारांचा, आविष्कारांचा, वर्तमान, भूत, भविष्याच्या बंधनापलिकडे जाऊन अक्षर अविनाशी अमर बनविण्याचे कार्य करण्याची क्षमता म्हणजे लेखन क्षमता होय.

**सर्जनात्मक विकास प्रतिमान -** विल्यम गॉर्डनने सृजनशीलतेबाबत मांडलेल्या उत्पत्तीच्या आधारावर ब्रुस जॉयस या अमेरिकन शिक्षण तज्ज्ञाने केलेली अध्यापनाची विशिष्ठ पद्धती.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे :-

उद्दिष्टे मांडताना सर्जनात्मक लेखन याप्रकारात निबंध प्रकार येतो त्याला अनुसरून उद्दिष्टे मांडली आहेत. ज्या ठिकाणी सर्जनात्मक असा उल्लेख आहे त्या ठिकाणी सर्जनात्मक लेखन प्रकारापैकी निबंध हाच प्रकार अपेक्षित आहे असे मानावे.

१. सर्जनात्मक लेखनाच्या प्रचलित पद्धतींचा शोध घेणे.

२. सर्जनात्मक लेखनाच्या प्रचलित पद्धतींचा अभ्यास करून त्यातील कमतरतांचा अभ्यास करणे.

३. सर्जनात्मक लेखनाच्या प्रचलित पद्धतीतील कमतरता भरून काढण्यासाठी सर्जनात्मक विकास प्रतिमानाची उपयोगिता अभ्यासणे.

४. सर्जनात्मक विकास प्रतिमानाचा वापर करून इयत्ता ६ वी व ७ वी तील विद्यार्थ्यांच्या सर्जनात्मक लेखन क्षमतेवर पडणारा परिणाम अभ्यासणे.

५. इयत्ता ६ वी व ७ वी तील विद्यार्थी वयोगटाचा सर्जनात्मक लेखन क्षमतेवर पडणारा परिणाम अभ्यासणे.

६. विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष उपमा निर्मितीची क्षमता विकसित करणे.

७. विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिगत उपमा निर्मितीची क्षमता विकसित करणे.

८. विद्यार्थ्यांमध्ये विरोधाभासी शब्द निर्मितीची क्षमता विकसित करणे.

## १.५ संशोधन परिकल्पना :-

वरील उद्दिष्टांवर आधारित पुढील शून्य परिकल्पना मांडण्यात आलेल्या आहेत.

१. सर्जनात्मक विकास प्रतिमानाचा अध्यापनात वापर करून केलेले लेखन व प्रचलित पद्धतीचा अध्यापनात वापर करून केलेले लेखन यामधील गुणात सर्जनात्मक दृष्ट्या सार्थ फरक आढळत नाही.

२. इयत्ता ६ वी व इयत्ता ७ वी च्या विद्यार्थी वयोगटातील सर्जनात्मक लेखनाततील गुणात सार्थ फरक आढळत नाही.

## १.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

### १.६.१ संशोधनाची व्याप्ती -

१. सदर संशोधनासाठी संशोधकाने कुडाळ तालुक्यातील इयत्ता ६ वी व ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेल्या सर्वच्या सर्व २१ शाळा शिक्षक मुलाखतीसाठी व सर्वेक्षणासाठी निवडल्या आहे.

२. संशोधकाने निबंध लेखन क्षमता या पूर्व घटकाच्या अनुषंगाने परामर्श घेतला आहे.

३. उच्च प्राथमिक स्तरावरील ६ वी व ७ वी च्या सर्व बौद्धिक पातळीवरील विद्यार्थ्यांचा संशोधनामध्ये (न्यादर्श निवडीमध्ये) विचार केलेला आहे.

४. सदर संशोधनात प्रायोगिक पद्धतीने निबंध लेखनाचे केलेले अध्यापन प्राथमिक स्तरावरील कोणताही शिक्षक माहितीपर मार्गदर्शन घेऊन अध्यापन करू शकतो.

### १.६.२ मर्यादा -

१. हे संशोधन उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता ६ वी व ७ वी च्या विद्यार्थी वयोगटापुरतेच मर्यादित आहे.

२. सदर संशोधन हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यापुरते मर्यादित आहे.

३. सदर संशोधन उच्च प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमातील मराठी लेखन क्षमतातील निबंध लेखन भागापुरतेच मर्यादित आहे.

४. सदर संशोधन उच्च प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमाच्या माध्यमिक शाळांना जोडलेल्या वर्गापुरते मर्यादित आहे.

**१.७ संशोधनाची कार्यपद्धती :-**

**अ)संशोधन पद्धती -**

संशोधकाने शैक्षणिक संशोधनाच्या विविध पद्धतीपैकी प्रचलित पद्धतीता मागोवा घेण्यासाठी सर्वेक्षण व मुलाखतीचा उपयोग केला. सर्जनात्मक विकास प्रतिमानाची परिणामकारकता प्रचलित सर्जनात्मक लेखनाच्या तुलनेत अभ्यासावयाची असल्याने प्रायोगिक पद्धतीतील दोन समान गट अभिकल्पाचा वापर केला.

ब) नमुना निवड -

कुडाळ तालुक्यातील इयत्ता ६ वी व ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेल्या एकूण २१ शाळा आहेत. इयत्ता ६ वी मध्ये ७३२ मुले व ६१५ मुली मिळून १३४७ विद्यार्थी वरील २१ शाळांमध्ये आहेत. इयत्ता ७ वी मध्ये ७२० मुले व ६४६ मुली असून १३६६ विद्यार्थी वरील शाळांत शिक्षण घेत आहेत. २१ शाळांपैकी २१ शाळातील ६ वी व ७ वी ला मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांची सर्वेक्षण प्रश्नावली व मुलाखतीसाठी निवड केली. (१०० टक्के नमुना निवड) २१ शाळांपैकी यादृच्छिक पद्धतीने (लॉटरी पद्धतीने) ३ शाळा (१५ टक्के शाळा) निवडण्यात आल्या. या शाळांमधील ६ वी व ७ वी च्या एकूण २७७ विद्यार्थ्यांवर (म्हणजेच १०.२१ टक्के विद्यार्थी संख्या) प्रयोग करण्यात आला.

क) संशोधनाची साधने -

संशोधनात विविध प्रकारची माहिती व आकडेवारी जमा करण्यासाठी विविध साधने वापरली जातात. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने प्रचलित पद्धतीच्या निबंध लेखनाचे तंत्र अभ्यासण्यासाठी प्रश्नावली व मुलाखती (शिक्षकांच्या) या साधनांचा वापर केला आहे. प्रायोगिक व नियंत्रित गटांना अध्यापन केल्यानंतर घेतलेल्या पूर्व व अंतिम चाचणीचे मूल्यमापन म. बा. कुंडले यांच्या 'A test of Literary Creativity in Marathi' या प्रमाणित चाचणीद्वारे केले.

ड) संख्याशास्त्रीय विश्लेषण -

संशोधकाने प्रायोगिक व नियंत्रित गटांना प्रमाणित चाचणीद्वारे मूल्यमापन निकष लावून मिळालेल्या संख्याशास्त्रीय माहितीला 't' परिक्षिका लावून विश्लेषण करण्यात आले.

इ) संशोधनाची कार्यपद्धती -

दोन समान गट अभिकल्प वापर - प्रथम संशोधकाने मराठी भाषा शिक्षकांच्या मुलाखती व प्रश्नावलीत दिलेल्या प्रतिसादावरून सर्जनात्मक लेखनाच्या प्रचलित पद्धतीचा अभ्यास केला. प्रचलित पद्धतीतील कमतरता कमी करणेसाठी सर्जनात्मक विकास प्रतिमानाचा अभ्यास केला. संशोधकाने प्रायोगिक पद्धतीचा वापर करताना दोन समान पात्रतेचे गट त्यांना सहामाही परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर केले. प्रकल्पकाने एक विशिष्ट घटक निवडून (निबंध) त्याचे पाठ टाचण प्रायोगिक चलाच्या घनमात्रेने तयार केले. तेच पाठ टाचण प्रायोगिक प्रभावांचा अभाव असेल असे तयार केले. (नियंत्रित गटाकरीता) नियंत्रित गटाला स्वत:च्या पद्धतीने निबंध लिहावयास सांगितले (पूर्व चाचणी) त्यानंतर ताबडतोब त्यांना प्रचलित पद्धतीच्या पाठ टाचणाचा (प्रायोगिक प्रभावाच्या अभावांचे टाचण) वापर करून अध्यापन केले व त्यानंतर निबंध लिहून घेतला. ( अंतिम चाचणी) प्रायोगिक गटाला तोच निबंध लिहायला सांगून (पूर्व चाचणी) त्यानंतर सृजनात्मक विकास प्रतिमानाच्या पाठ टाचणाने अध्यापन करून निबंध लेखन करण्यास सांगितले. (अंतिम चाचणी) दोन गटांनी अंतिम चाचणीत मिळविलेल्या गुणांची तुलना 't' परिक्षिका लावून केली.

| प्रायोगिक गट | नियंत्रित गट |
| --- | --- |
| १) पूर्व चाचणी | १) पूर्व चाचणी |
| २) प्रायोगिक उपायांची घनमात्रा | २) प्रायोगिक उपायांचा अभाव |
| ३) अंतिम चाचणी (X1) | ३) अंतिम चाचणी (X2) |

४) दोन गटांना अंतिम चाचणीत मिळालेल्या गुणांची तुलना

## १.८ प्रकरण योजना :-

प्रस्तुत संशोधनात सशोधकाने संशोधनाची माहिती कशाप्रकारे मांडलेली आहे, कोणत्याप्रकरणात कोणत्या घटकांचे विवेचन केले आहे. याचा अल्पसा परिचय या घटकांत करून दिला आहे.

**प्रकरण पहिले - प्रस्तावना**

या पहिल्या प्रकरणात संशोधकाने समस्येची पार्श्वभूमी व महत्त्व, समस्या विधान, त्यामधील परिभाषिक शब्दांचा अर्थ, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाची कार्यपद्धती याचबरोबर संशोधनाची साधने इत्यादी बाबी स्पष्ट केल्या आहेत.

**प्रकरण दुसरे - संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचे समालोचन**

या प्रकरणामध्ये संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा घेतला आहे. इतर संशोधकांनी संशोधित विषयांशी संबंधित कोणकोणते संशोधन केले, कोणती साधने वापरली आहेत, कोणते निष्कर्ष मांडले आहेत याचा आढावा घेऊन प्रस्तुत संशोधन नाविन्यपूर्ण असल्याचे नमूद केले आहे.

**प्रकरण तिसरे - सर्जनशीलता**

या प्रकरणामध्ये संशोधकाने सर्जनशीलता म्हणजे काय, त्याची व्याख्या, सर्जनशीलतेचे घटक यांची माहिती दिली आहे.

**प्रकरण चौथे - संशोधनाची कार्यपद्धती**

संशोधकाने संशोधनाच्या कार्यपद्धतीचे वर्णन या प्रकरणात केलेले आहे. संशोधकाने आपल्या संशोधनासाठी कोणती पद्धती व साधने वापरली इत्यादीच्या संदर्भात या प्रकरणात विवेचन केले आहे.

**प्रकरण पाचवे - संकलित माहितीचा नोंद, विश्लेषण व वर्गीकरण**

या प्रकरणात संशोधकाने मिळालेल्या माहितीची नोंद करून त्या माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण व अर्थनिर्वचन केले आहे.

**प्रकरण सहावे - सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी**

या प्रकरणात संशोधकाने केलेल्या कार्यातून व अभ्यासलेल्या सर्व गोष्टीवरून दिसून आलेले निष्कर्ष व शिफारशी दिल्या आहेत.

**१.९ समारोप :-**

संशोधकाने अभ्यासलेल्या पहिल्या प्रकरणात संशोधनाची गरज व महत्त्व, समस्येचे विधान, पारिभाषिक शब्दांचा अर्थ, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाची कार्यपद्धती, संशोधनाची साधने व प्रकरण योजना इत्यादी बाबींची ओळख करून देण्यात आलेली आहे.

यापुढील प्रकरणात संशोधन विषयांशी संबंधित साहित्याचा आढावा घेतला आहे. इतर संशोधकांनी संशोधित विषयाशी संबंधित कोणकोणते संशोधन केले आहे, कोणती साधने वापरली आहेत, कोणते निष्कर्ष मांडले आहेत याचा आढावा पुढील प्रकरणामध्ये घेतला आहे.